अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिकेका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल **aadmcgeneral@punecorporation.org**
अपिल क्र. २४/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ५२९४ दि.०५/१०/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२४/२०१९

**श्रीमती शुभांगी गणेश ढवळे**
साततोटी पोलीस चौकी मागे,
कसबापेठ, पुणे ४११ ०११

------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**श्रीमती शुभांगी गणेश ढवळे,** साततोटी पोलीस चौकी मागे, कसबापेठ, पुणे ४११ ०११ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे हानगरपालिका यांचेकडे दि. ०९.०७.२०१९ रोजी अर्ज करून “१)पुणे महानगरपालिकेकडील सेवानिवृत्त कर्मचारी यांचे विरूद्ध दाखल निवृत्ती वेतन थाबविणेबाबतचे तक्रार अर्जावर करण्यात आलेली कार्यवाही व तद् बाबत नस्ती यांच्या साक्षांकित प्रत मिळवीत.२) रमेश विष्णू खामकर या सेवानिवृत्त कर्मचारी यांचे बाबत आपणाकडील उपलब्ध सर्व कागदपत्राच्या प्रती मिळणे” बाबत माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र. जमाआ/आस्था/२९३४, दि. १९.०७.२०१९ अन्वये जन माहिती अधिकारी, उपलेखापाल,(पेन्शन विभाग), व मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे अर्ज वर्ग केला आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ९.०७.२०१९ | ११.०७.२०१९ | १०.०८.२०१९ | २२.०७.२०१९ | -- |

अपिलार्थी यांनी "१)वर्णन केलेल्या माहिती संदर्भात कोणतीच माहिती जाणीवपूर्वक टाळली जातेय.२) मूळ मुद्यास टाळून इतर माहिती देण्यात आली आहे." असे नमूद करून अपील क्र. २४/२०१९ चा अपील अर्ज दि. २०.०९.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २०.०९.२०१९ | २०.०९.२०१९ | २०.०८.२०१९ | नाही<br>विलंब ३० दिवस | नाही |

सदर प्रकरणी दि. ०३.१०.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्रीमती शुभांगी गणेश ढवळे,** यांच्या वतीने **श्री. रमाकांत कांबळे** हे उपस्थित होते. **श्री.चेतन कबाडे,** जन माहिती अधिकारी, प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

**विवेचन**

**श्री.चेतन कबाडे,** जन माहिती अधिकारी, प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचेकडील आस्थापना विभागाकडची माहिती प्राप्त झालेली आहे. व ते अपिलकर्त्यास प्राप्त झाले आहे. तथापि जन माहिती अधिकारी, उपलेखापाल,(पेन्शन विभाग), यांचेकडील माहिती पोस्टाने माहिती पाठवल्याची पोहच सादर केली आहे.तसेच मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाने श्री.खामकर यांचे माहिती न देण्याबाबतचे पत्र प्राप्त झाले असल्याचे प्रतिपादन केले. तथापि कलम ११ अन्वये कार्यवाही झालेली दिसत नाही, असे प्रतिपादन केले.

## <u>आदेश</u>

जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी संबंधित माहिती दिल्याने अपील निकाली काढणेत येत आहे. जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग यांनी उर्वरीत माहिती करिता जन माहिती अधिकारी, उपलेखापाल,(पेन्शन विभाग), व मा.महापालिका सहाय्यक आयुक्त, धनकवडी-सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय यांचेकडे अर्ज वर्ग केला असल्याने निकालाची प्रत उचित कार्यवाही करिता संबंधित विभागाचे प्रथम अपिल अधिकारी, जन माहिती अधिकारी यांना पाठविण्यात यावी.अपिलार्थी यांना त्यांचे वरील विवेचन मध्ये मुद्दा १, २ मध्ये नमूद केल्यानुसार अपील क्र. २४/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका